**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार**

**क्र. : मुमाआ-२०१९/नों. क्र. १०९७/त. क्र. २३३/२०/०१**

**श्री. इक्बाल आर. खान**
एक्ता नगर, ए/१५, रुम नं.१०,
यशवंतराव चव्हाण नगर.घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड,
मंडाळा मानखुर्द (प.) मुंबई – ४०० ०४३.

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का)**
एच/पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,
एच/पूर्व विभाग यांचे कार्यालय, प्लॉट क्र. १३७, टीपीएस ५,
दुसरा रोड. प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पू.), मुंबई ४०० ०५५.

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता एच/पूर्व विभाग**
एच/पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,
एच/पूर्व विभाग यांचे कार्यालय, प्लॉट क्र. १३७, टीपीएस ५,
दुसरा रोड, प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पू.), मुंबई ४०० ०५५.

**खुलासा सुनावणी दिनांक : १३.०४.२०२२**

उक्त प्रकरणी दिनांक २०.११.२०२० रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत :

तक्रारदार यांनी दि. २५.०७.२०१७ रोजी दाखल केलेल्या द्वितीय अपीलाबाबत अपील क्र.मुमाआ-२०१८/नों.क्र. ४६७९/अपील क्र. १९४५/२०१८/०१ नुसार दि. ०१.०१.२०१६ ते माहिती अर्जातील ०२.०२.२०१७ या रोजीपर्यंत एच/पूर्व विभागातील प्रभाग क्र. ८७ मधील तोडण्यात आलेली अनधिकृत बांधकामाची व या ठिकाणी कोणकोणते क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्यात आली व त्या अनधिकृत बांधकामावर किती लोकांकडून तक्रार करण्यात आलेली आहे याबाबतची माहिती मागितली असून राज्य माहिती आयोगाने दि. ११.०९.२०१८ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसाच्या आत अपिलकर्ता यांनी मागणी केलेली माहिती जलद गतीच्या टपालाने नि:शुल्क पाठविण्यात यावीत. तथापि अद्याप माहिती मिळाली नसल्याने तक्रारदार यांनी दि.२६.१०.२०१९ रोजी आयोगापुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या दि. ०२.०२.२०१७ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती अद्याप तक्रारदार यांना मिळालेली नसल्याचे सांगितले.

AARTI

दृकश्राव्य माध्यमाद्वारे आजच्या सुनावणीस तक्रारदार यांनी असे विशद केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे.

आजच्या सुनावणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. तरी तक्रारीची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित राहावे. सदर **तक्रारीची पुनर्सुनावणी दिनांक ११.१२.२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता** आयोजित करण्यात येत आहे. तरी तक्रारदार व जन माहिती अधिकारी यांनी स्वत: ऑनलाईन उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील.

उक्त प्रकरणी दिनांक ११.१२.२०२० रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत :

दृकश्राव्य माध्यमाद्वारे आजच्या पुनर्सुनावणीस तक्रारदार यांनी विशद केले की, त्यांना अपूर्ण माहिती प्राप्त झाली. त्यांना खालीलप्रमाणे माहिती मिळाली नाही –

१. पंचनाम्याची प्रत
२. नोटीसची प्रत
३. निष्कासन करताना कोणते अधिकारी उपस्थित होते त्यांचे नाव
४. निष्कासन पत्र
५. निष्कासन वसुली
६. छायाचित्र
७. पोलीस अधिकाऱ्यांच्या बरोबर पत्रव्यवहार

आजच्या सुनावणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी दोन वेळा अनुपस्थित आहेत. यास्तव तक्रारीची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे.. सदर **तक्रारीची पुनर्सुनावणी दिनांक २२.०१.२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता** आयोजित करण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वत: ऑनलाईन उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील.

दृकश्राव्य माध्यमाद्वारे तक्रारदार यांनी विशद केले की, मा. राज्य मुख्य माहिती आयुक्तांच्या दिनांक ११.१२.२०२० रोजीच्या आदेशाचे अनुपालन झालेले नाही.

जन माहिती अधिकारी श्री. कांबळे, यांना आदेश देण्यात येत आहेत की, त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या **कलम २० (१) व कलम २०(२)** अन्वये कारवाई का करण्यात येऊ नये याबाबतचे स्पष्टीकरण आयोगात ३० दिवसाच्या आत सादर करण्यात यावे. जर ३० दिवसाच्या आत आयोगात स्पष्टीकरण प्राप्त

झाले नाहीतर त्यांना याबाबत काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन त्यांच्यावर पुढची कारवाई करण्यात येईल. या आदेशासह तक्रार निकाली काढण्यात येत आहे."

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का), एच/पूर्व विभाग श्री. कांबळे यांनी आयागात ३० दिवसात त्यांचे स्पष्टीकरण सादर करण्यात आले नाही.

तक्रारकर्ता यांना माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे व जाणीवपूर्वक विलंब केला असून कोणत्याही वाजवी कारणाशिवाय अक्षम्यपणे आणि सातत्याने माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का), एच/पूर्व विभाग श्री. कांबळे यांनी तक्रारदार यांना माहिती दिली नाही. तसेच, उक्त आदेशानुषंगाने कोणताही खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७ चे स्पष्टपणे उल्लंघन केलेले आहे. **या प्रकरणातील वस्तुस्थिती व परिस्थिती लक्षात घेता, या प्रकरणात, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का), एच/पूर्व विभाग श्री. कांबळे यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये रु. ५,०००/- एवढी शास्ती करण्यात येत आहे.**

सदरची शास्ती त्यांच्या मासिक वेतनातून एका हप्त्यात वसूल करण्यात यावी व शासन परिपत्रक सा.प्र.वि. दिनांक ०९.०५.२००७ व शासन सा.प्र.वि. शुध्दिपत्रक दिनांक २८.०५.२००७ मध्ये नमूद केलेल्या पुढील लेखाशीर्षाखाली जमा करावी.

००७०-इतर प्रशासनिक सेवा

६० इतर सेवा, ८०० इतर जमा रकमा

(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१).

शास्तीचा भरणा विहित मुदतीत करून आयोगाला अनुपालन अहवाल पाठवावा.

सहाय्यक आयुक्त, एच/पूर्व विभाग यांनी आयोगास आदेश प्राप्त झाल्यापासून दोन महिन्यांचे आत अनुपालन अहवाल सादर करावा. या आदेशासह तक्रार अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**

**दिनांक : १३.०४.२०२२**

**(सुमित मल्लिक)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

प्रत: सहाय्यक आयुक्त, एच/पूर्व- विभाग महापालिका कार्यालय इमारत,१ला मजला, प्रभात कॉलनी, सांताक्रुझ पूर्व,मुंबई-५५ यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.

AARTI